# अर्थशास्त्र

## बी.ए. द्वितीय वर्ष (सेमिस्टर IV)

- डॉ. प्रज्ञा बागडे

-

## व्यापारी अधिकोषांची प्रत्यय निर्मिती

## (Credit Creation of Commercial Banks)

व्यापारी बॅका या प्रामुख्याने नफा कमविण्याच्याच हेतूने स्थापन झालेल्या असतात. लोकांकडून ठेवी स्विकारणे व गरजू ग्राहकांना कर्ज देणे या कार्याच्या अनुषंगानेच व्यापारी अधिकोष प्रत्यय निर्मितीचे अत्यंत महत्वाचे कार्य करतात. व्यापारी अधिकोषाच्या प्रत्ययनिर्मितीच्या कार्यामुळे एकंदर मुद्रा पुरवठ्यात भर पडते. त्यामुळे किमतीच्या पातळीत वाढ होणे, रोजगार, उत्पन्न यात वाढ होते अशा रितीने प्रत्यय निर्मितीमुळे अर्थव्यवस्थेवर परिणाम घडून येत असतात.

**प्रत्यय निर्मिती म्हणजे काय? (What is the Credit Creation)-**

व्यापारी अधिकोष आपल्या ग्राहकांना कर्ज देऊन प्रत्यय निर्मिती करतो. वेगवेगळ्या अर्थशास्त्रज्ञांनी प्रत्ययाच्या वेगवेगळ्या व्याख्या केलेल्या आहेत.

**प्रा. जी.डी.एच कोल** यांनी प्रत्यय निर्मितीची व्याख्या पुढीलप्रमाणे केली.

“प्रत्यय ती क्रयशक्ती होय जी उत्पन्नाच्या स्वरुपात प्राप्त होत नाही. किंबहुना ती ठेवीदारांनी अधिकोषात जमा केलेल्या निष्क्रिय प्राप्तीला सक्रीय बनवून किंवा एकूण क्रयशक्तीच्या परिमाणातील वाढीच्या स्वरुपात, वित्तीय संस्थांनी निर्माण केलेली क्रयशक्ती होय.”

थोडक्यात, प्रत्यय निर्मिती म्हणजे, अधिकोषाने स्वत:जवळील रोख ठेवींच्या आधारे जास्त प्रमाणात धनादेश काढण्याचा अधिकार देण्याच्या प्रक्रियेला 'प्रत्यय निर्मिती' असे म्हणतात.

व्यापारी अधिकोषांचा मुख्य उद्देश नफा कमविणे हा असतो त्यामुळे ठेवींदारांकडून प्राप्त झालेला पैसा ते गरजू ग्राहकांना कर्ज देऊन, त्याच्या हुंड्या वटवून, सरकारी रोखे खरेदी करुन गुंतवितात. कर्ज देतांना अधिकोष कर्जदार ग्राहकाला कर्जाची रक्कम रोख स्वरुपात देत नाही तर त्या ग्राहकाच्या नावावर एक चालू ठेव निर्माण करतो. व त्या ठेवीतील रक्कम धनादेशाद्वारे काढण्याचा अधिकार देतो. अशा प्रकारे ग्राहकाचे एक चालू खाते निर्माण केले जाते. अशाच चालू ठेवी कर्ज देणे, हुंड्या वटविणे, सरकारी रोखे, खाजगी कंपन्यांची ऋणपत्रे खरेदी करणे इत्यादी व्यवहारातून चालू ठेवी निर्माण करण्याच्या क्रियेला प्रत्यय निर्मिती असे म्हणतात.

**प्रत्यय निर्मितीची प्रक्रिया (Process of Credit Creation)-**

पतनिर्मिती किंवा प्रत्यय निर्मिती हे अधिकोषांचे अत्यंत महत्वाचे कार्य होय. जो अधिकोष प्रत्यय निर्मिती करीत नाही तो अधिकोष नसून पैशाचे गोदाम होय असे म्हणण्यात येते. अधिकोषांच्या या प्रत्यय निर्मितीच्या कार्याबद्दल प्रा. सेयर्स म्हणतात "अधिकोष ह्या पैशाचा पुरवठा करणाऱ्या संस्था नसून त्या एका अर्थाने पैसा निर्माण करणाऱ्या संस्था आहे"

प्रा. हॉम यांच्या मते, अधिकोषांच्या ठेवी पुढील दोन प्रकारच्या असतात.

१) रोख किंवा प्राथमिक ठेवी

२) निर्मिती ठेवी किंवा प्रत्यय ठेवी

## १) रोख किंवा प्राथमिक ठेवी (Primary Deposits)-

ग्राहकाकडून येणाऱ्या रकमा स्विकारुन ज्या ठेवी निर्माण होतात त्यांना प्राथमिक ठेवी किंवा रोख ठेवी असे म्हणतात. ह्या ठेवीतून ग्राहकांना धनादेशाच्या सहाय्याने पैसा काढता येतो. ह्या ठेवीवर अधिकोष ठेवीदारांना व्याज देते. ह्या ठेवी ठेवीदारांनी मागितल्याबरोबर परत कराव्या लागतात. अशा प्रकारे रोख ठेवींपासून कोणत्याही प्रकारची मिळकत होत नाही. उलट ह्या ठेवींचा हिशोब व इतर व्यवस्था ठेवावी लागते.

## २) निर्मिती ठेवी किंवा प्रत्यय ठेवी (Created Deposits)-

प्रत्यय ठेवी म्हणजे व्यापाऱ्यांना कर्ज देऊन निर्माण केलेल्या ठेवी होय. अधिकोषाचं खरे कार्य या ठेवींमध्येच समाविष्ठ आहे. अधिकोष ग्राहकांना कर्ज देतो, तेव्हा त्यांच्या नावे अधिकोषात कर्जाच्या रकमेइतकी ठेव निर्माण करतो. त्यामुळे ह्या कर्ज घेणाऱ्याा ग्राहकाला तेवढ्या रकमे इतके धनादेश त्या अधिकोषावर काढू शकतो व त्या धनादेशाचे शोधन करावे लागते.

अशा प्रकारे ह्या ठेवी निर्माण करण्यात येत असल्यामुळे ह्या ठेवींना निर्मित ठेवी असे म्हणतात. ह्या ठेवी कर्जाच्या व्यवहारातून निर्माण होत असल्यामुळे 'कर्ज ठेवी निर्माण करतात' असे म्हणतात. लॉर्ड केन्सच्या मते, 'ठेवी ह्या कर्जाची मुले आहेत.'

प्राथमिक ठेवींमुळे अधिकोषात बरीच रोख रक्कम जमा होते. ह्या पैकी बरीच रोख रक्कम ठेवीदारांकडून काढली न जाता अधिकोषात पडून राहते. ह्या रोख रकमेच्या आधारावर अधिकोषांना कर्ज देणे शक्य होते. अशा प्रकारे अधिकोषांजवळील रोख ठेवींच्या मात्रेवर निर्मित ठेवींची मात्रा अवलंबून असते व त्यामुळे केन्सच्या शब्दात 'कर्जे ही ठेवींची मुले आहेत.'

ग्राहकांना दिलेल्या कर्जावर अधिकोषाला व्याज मिळते व हा व्याजदर रोख ठेवींवर ज्या दराने व्याज द्यावे लागते त्यापेक्षा जास्त असतो. अशा रितीने प्रत्यय ठेवींवर मिळणारे व्याज व प्राथमिक ठेवींवर देण्यात येणारे व्याज यातील फरक म्हणजे व्यापारी अधिकोषांचा नफा असतो. त्यामुळे कर्ज देऊन प्रत्यय ठेवी निर्माण करणे हा व्यापारी अधिकोषांचा लाभदायक व्यवसाय असतो. अधिकोषांजवळील एकूण ठेवी पैकी प्रत्यय ठेवींचे प्रमाण जास्त असते.

प्राथमिक ठेवींमुळे व्यापारी अधिकोषात जेवढी रोख रक्कम शिल्लक असेल तेवढेच कर्ज देऊन प्रत्यय ठेवी निर्माण केल्या तर शुद्ध प्रत्यय निर्मिती होणार नाही जर व्यापारी अधिकोषांनी जवळ असलेल्या रकमेपेक्षा अधिक कर्ज देऊन प्रत्यय ठेवी निर्मिती केल्या असतील तर तेवढी अधिक प्रत्यय निर्मिती होईल जर प्राथमिक ठेवींमुळे व्यापारी अधिकोषाजवळ १० लाख रु. असतील आणि व्यापारी अधिकोषांनी केवळ १० लाख रु. चे कर्ज देऊन प्रत्यय ठेवी निर्माण केल्या असतील तर प्रत्यय निर्मिती झाली असे म्हणता येणार नाही. जर व्यापारी अधिकोषाने १० लाख रु. च्या आधारावर २५ लाख रु. चे कर्ज देऊन प्रत्यय निमिर्ती केली असेल तर १५ लाख रु. ची शुद्ध प्रत्यय निर्मिती झाली असे म्हणता येईल.

व्यत्पन्न ठेवींची निर्मिती अधिकोष प्राथमिक ठेवींच्या आधारावर करतो हे पुढील उदाहरणावरुन स्पष्ट होते. समता, अ या ठेवीदाराने अधिकोषातील त्याच्या खात्यात १००० रु. जमा केले ही १००० रु. ची प्राथमिक ठेव होय. ठेवीच्या किती प्रतिशत रक्कम ठेवीदार एकाचवेळी परत मागू शकतो हे अधिकोषाला अनुभवाने माहित असते. त्यामुळे तेवढी प्रतिशत रक्कम रोख ठेवून उरलेली रक्कम गरजू ग्राहकाला कर्जाऊ म्हणून देतो. समजा, १००० रु. च्या २० टक्के रक्कम म्हणजे २०० रु. रोख जवळ ठेवून ८०० रु. ब या व्यक्तीला कर्जाऊ देतो. या ठिकाणी ८०० रु. २० टक्के रक्कम म्हणजे १६० रु. रोख

जवळ ठेवून उरलेली ६४० रु. क या व्यक्तीला कर्ज म्हणून देतो. या ठिकाणी पुन्हा ६४० रु. च्या २० टक्के म्हणजे १२८ रु. रोख रक्कम जवळ ठेवून ५१२ रु. ड या व्यक्तीला कर्जाऊ देतो.

अधिकोष ग्राहकाला कर्ज दिल्यानंतर ती रक्कम त्यांच्या खात्यात जमा करतो. जमा रकमेच्या २० टक्के रोख रक्कम ठेवून उरलेली ८० टक्के रक्कम दुसऱ्या ग्राहकाला कर्ज म्हणून देण्यासाठी वापरतो. हे अधिकोष आपल्या अनुभवावरुन करत असतो. अशा प्रकारे अधिकोष १००० रु. च्या प्राथमिक ठेवींच्या आधारावर ४००० रु. कर्जे देऊन ४००० रु. च्या व्यत्पन्न ठेवी निर्माण करु शकतो.

ही प्रत्यय निर्मिती अधिकोष प्रामुख्याने कर्ज देणे, हुंड्या वटविणे, सरकारी रोखे किंवा ऋणपत्रे खरेदी करणे या व्यवहारातून सुद्धा करीत असतात.

## प्रत्यय निर्मिती कोण करतो?

प्रत्यय निर्मिती खऱ्या अर्थाने कोण करतो याबद्दल अर्थशास्त्रज्ञांमध्ये मतभेद दिसून येतो. व्यापारी अधिकोष प्रत्यय निर्मिती करुन चलन परिमाणात भर टाकतात असे प्रा. हार्टले विदर्स यांनी प्रतिपादन केले आहे. परंतु डॉ. वाल्टर लीफ ह्यांनी विरोध दर्शविला. त्यांच्या मते प्रत्यय निर्मितीचे कार्य खऱ्या अर्थाने अधिकोषाचे प्राथमिक ठेवीदार करतात. कारण ठेवीदार आपल्या नगद ठेवी अधिकोषाजवळ ठेवतात. म्हणून अधिकोष ह्या नगद ठेवींच्या आधारावर काही पट प्रत्ययनिर्मिती करु शकतात. रोख ठेवींच्या प्रमाणावर अधिकोषाच्या प्रत्यय निर्मितीचे प्रमाण अवलंबून असते. अधिकोषाजवळ जेवढ्या रोख ठेवी जास्त असतील तेवढी जास्त प्रत्यय निर्मिती ते करु शकतात. रोख ठेवी असतील तर अधिकोषाची प्रत्यय निर्मिती कमी होते. म्हणून डॉ. वाल्टर लीफ पतनिर्मितीचे श्रेय अधिकोषाजवळ नगद ठेवी ठेवणाऱ्या ठेवीदारानांच देतात.

वास्तविक पाहता ठेवीदारांनी ठेवलेल्या नगद ठेवींमुळे अधिकोष प्रत्यय निर्मिती करु शकतात हे जरी खरे असले तरीपण या रोख ठेवींचा कौशल्यपूर्ण उपयोग करुन संसाधनांच्या सुरक्षिततेची व तरलतेची हानी होऊ न देता त्याचा प्रत्यय निर्मितीसाठी कमी किंवा जास्त प्रमाणात उपयोग करण्याचा निर्णय अधिकोषालाच घ्यावा लागतो. त्यामुळे प्रत्यय निर्मितीचे श्रेय अधिकोषानांच दिले पाहिजे.

**व्यापारी अधिकोषांचा रोख राखीव निधी (CRR of Commercial Bank)-**

रोख राखीव निधीचे प्रमाण व्यापारी अधिकोषांसाठी मध्यवर्ती अधिकोषाने ठरवून दिलेल्या किमान प्रमाणानुसार ठेवावा लागतो. या प्रमाणानुसार व्यापारी अधिकोषांना रिझर्व्ह बॅंकेकडे रोख प्रमाणात निधी ठेवावा लागतो. पतनियंत्रणाचे कार्य परिणामकारकरित्या होण्यासाठी रिझर्व्ह बॅंक रोख राखीव निधींचा वापर करते.

प्रत्यय निर्मिती अधिकोषातील जमा रोख राखीव निधीच्या अनुपातावर अवलंबून असते. रोख राखीव निधी अनुपात काढण्याचे सूत्र पुढीलप्रमाणे

**प्रत्यय निर्मितीच्या मर्यादा (Limitations of Credit Creation)-**

व्यापारी अधिकोषाचे प्रत्यय निर्मितीचे कार्य लाभदायक आहे. त्यामुळे अधिकोषांकडून अनावश्यक प्रत्यय निर्मिती होण्याची शक्यता असते परंतु प्रत्यक्षात व्यापारी अधिकोषाला एक विशिष्ट मर्यादेच्या पलीकडे प्रत्यय निर्मिती करता येत नाही कारण त्यावर अनेक मर्यादा पडतात. त्या पुढील प्रमाणे

**१) देशातील एकूण पैशाचे परिमाण**

देशातील एकूण विधीग्राह्य मुद्रा किती आहे किंवा देशात एकूण रोख रक्कम किती आहे यावर अधिकोषातील रोख ठेवींची मात्रा अवलंबून असते. जर देशात रोख रक्कम

अधिक असेल तर प्रत्यय निर्मिती अधिक होईल. या उलट जर देशात रोख रक्कम कमी असेल तर प्रत्यय निर्मिती कमी होईल.

### २) समाजाची रोख रकमेची मागणी

लोक आपल्या उत्पन्नापैकी किती रोख रक्कम स्वत:जवळ बाळगतात आणि किती रोख रक्कम अधिकोषात ठेवतात यावर देखील प्रत्यय निर्मिती अवलंबून असते. लोक जर आपल्या जवळ जास्त रोख रक्कम बाळगत असतील तर अधिकोषामध्ये फारच थोडी रक्कम राहिल त्यामुळे अधिकोष मोठ्या प्रमाणावर प्रत्यय निर्मिती करु शकणार नाही.

### ३) प्राथमिक ठेवींचे प्रमाण

अधिकोष प्राथमिक ठेवींच्या आधारावर कर्जे देऊन प्रत्यय निर्मिती करतात. त्यामुळे अधिकोषातील प्राथमिक ठेवींचे परिमाण वाढल्यास अधिकोषांची प्रत्यय निर्मिती वाढते या उलट प्राथमिक ठेवींचे परिमाण कमी असेल तर अधिकोषाची प्रत्यय निर्मिती कमी होते.

### ४) रोखतेचे प्रमाण

ठेवींमधून रोख रकमेची होणारी मागणी पूर्ण करण्यासाठी प्रत्येक अधिकोषाला आपल्या ठेवींच्या विशिष्ट प्रमाणात रोख रक्कम जवळ ठेवावी लागते. या प्रमाणाला ‘रोखतेचे प्रमाण’ असे म्हणतात. हे प्रमाण जास्त असल्यास अधिकोषाला कमी प्रत्यय निर्मिती करावी लागते. या उलट हे प्रमाण कमी असल्यास अधिकोषाला जास्त प्रत्यय निर्मिती करता येते.

**५) तारणाचे स्वरुप**

तारण हे नेहमी मौल्यवान व सुरक्षित असावे. तारणाशिवाय व्यापारी अधिकोषांना प्रत्यय निर्मिती करता येत नाही. हे तारण रोखे, सोने, इमारत, जमिन इत्यादी स्वरुपात असावे लागते. अधिकोष प्रत्यय निर्मिती करुन ह्या संपत्तीचे रोख स्वरुपात रुपांतर करीत असतो. क्राऊथर यांनी म्हटल्याप्रमाणे व्यापारी अधिकोष हवेतून प्रत्यय निर्मिती करीत नाही तर इतर प्रकारच्या संपत्तीचे मुद्रेत रुपांतर करतात.

**६) केंद्रिय अधिकोषाचे धोरण**

जर केंद्रिय अधिकोषाला मुद्रा व प्रत्ययाचे परिमाण कमी करावयाचे असेल तर व्यापारी अधिकोषाच्या प्रत्यय निर्मितीवर मर्यादा पडतात व प्रत्यय निर्मितीची क्षमता कमी होते. जर केंद्रिय अधिकोषाचे प्रत्यय धोरण हे जर प्रत्यय विस्ताराचे असेल आणि त्या धोरणाच्या अनुषंगाने विविध उपायांचा अवलंब केला जात असेल तर प्रत्यय निर्मितीची क्षमता वाढते.

**७) समाशोधन गृहाची सोय**

देशात समाशोधन गृहाची सोय असेल तर निरनिराळ्या अधिकोषांवर काढण्यात आलेल्या धनादेशाची परस्पर वजावट होते. त्यामुळे फारच थोड्या धनादेशाबद्दल रोख रक्कम अधिकोषाला द्यावी लागते. त्यामुळे रोख रकमेची बचत होऊन व्यापारी अधिकोषाला थोड्या रोख रकमेच्या आधारावर बरीच प्रत्यय निर्मिती करता येते.

## ८) व्यापारी परिस्थिती

प्रत्यय निर्मिती ही त्या देशातील व्यापाराच्या परिस्थितीवर अवलंबून असते. तेजीच्या काळात प्रत्ययाची मागणी वाढून अधिक प्रत्यय निर्मिती होते या उलट मंदीच्या काळात प्रत्ययाची मागणी कमी झाल्यामुळे प्रत्यय निर्मितीत घट होते.

## भारतातील अधिकोषण क्षेत्रातील सुधारणा (Reform in Banking Sector in India)-

भारत सरकारने भारतातील अधिकोषण पद्धतीत सुधारणा करण्याबाबत सूचना करण्यासाठी रिझर्व्ह बँकेचे भूतपूर्व गव्हर्नर एम. नरसिंहम यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त करण्यात आली. या समितीने आपला अहवाल नोव्हेंबर १९९१ मध्ये सादर केला. त्यानंतरही अधिकोषण पद्धतीत अनेक टप्प्यात सुधारणा करण्यात आल्या. या सुधारणा भारताच्या आर्थिक विकासासाठी वित्तीय व्यवस्था विकसित करणे अत्यंत आवश्यक होते. आणि या सुधारणांमुळे भारतातील अधिकोषण व्यवस्थेत व्यापक बदल घडून आले.

## श्री. एम. नरसिंहम समितीच्या शिफारशी (१९९१)-

१९९१ मध्ये भारत सरकारने अधिकोषण क्षेत्रात आर्थिक सुधारणा घडवून आणल्या. देशाच्या आर्थिक विकासासाठी वित्तीय व्यवस्था विकसित करणे आवश्यक असते. हे लक्षात घेऊन भारत सरकारने श्री. एम. नरसिंहम यांच्या अध्यक्षतेखाली ९ सदस्यांची एक समिती नियुक्त केली होती. या समितीने नोव्हेंबर १९९१ मध्ये अहवाल सादर केला. या अहवालात नरसिंहम समितीने केलेल्या सर्व शिफारशी स्विकारण्यात आल्या. १९९१-९२ ते १९९७-९८ या कालखंडात अधिकोषण व्यवस्थेत पुढील सुधारणा करण्यात आल्या.

**१) कायदेशीर तरलता अनुपात -**

कायदेशीर तरलता अनुपात हा ठेवींच्या ३८.५ टक्के होता. तो घटवून मार्च १९९७ ला २५ टक्के करण्यात आला.

**२) रोख राखीव अनुपात -**

पूर्वी १५ टक्के असलेला रोख राखीव अनुपात हा मार्च १९९३ मध्ये १४ टक्के करण्यात आला. परंतु विदेशी भांडवलात झालेली वाढ आणि त्यामुळे तरलतेत झालेली वृद्धी यामुळे ऑगस्ट १९९४ मध्ये तो १५ टक्के करण्यात आला. परिस्थितीत सुधारणा झाल्यानंतर रिझर्व्ह बँकेत या अनुपातात घट करुन तो १० टक्के केला. यामुळे सेवा क्षेत्र व औद्योगिक क्षेत्रात कर्जपुरवठा वाढला.

**३) अधिकोष कर्जाच्या सीमा -**

१९९१–९२ मध्ये व्याजदरात पुढील बदल केले.

अ) स्टेट बँक व इतर बँकांनी २ लाख रुपयांपेक्षा जास्त अग्रिमावर देण्यात येणाऱ्या व्याज दरात घट करण्यात आली.

ब) एका वर्षापेक्षा जास्त मुदत ठेवी आणि अनिवासी भारतीयांच्या ठेवींवरील व्याजदर अनियंत्रित करण्यात आला.

क) सर्व सहकारी अधिकोषावरील ठेवी व अग्रिम यावरील व्याजदर अनियमित करण्यात आले. न्यूनतम व्याजदर १.३ टक्के असावा. परंतु ही अट शहरी सहकारी अधिकोषांना लावली नाही.

ड) अनुसूचित व्यापारी अधिकोषांना आपल्या ठेवींवर व्याजदर ठरविण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले. परंतु हे व्याजदर न्यूनतम व महत्तम दराच्या मर्यादांमध्ये असावेत.

**४) भांडवल पर्याप्तता मानदंड -**

१९९२ ला भांडवल पर्याप्तता मानदंड ८ टक्के निर्धारित करण्यात आले. मार्च १९९६ पर्यंत सर्व सार्वजनिक क्षेत्रातील अधिकोषांनी हा मानदंड पूर्ण केला. आर्थिक सुधारणा अधिकोषांना आपली संपत्ती ऋणपत्रे, कर्जरोखे, हिस्से इत्यादीमध्ये गुंतविण्याची परवानगी सरकारने दिलेली आहे. या कार्यामुळे अधिकोषांची लाभप्रदता वाढली.

**५) व्यापारी अधिकोषांवर देखरेख -**

१९९२ च्या प्रतिभूती घोटाळ्यामुळे व्यापारी अधिकोषांवरील देखरेख अधिक कडक व कठोर करण्याचा विचार रिझर्व्ह बँक करीत आहे.

**६) विवेकशील मानदंडाचा आरंभ -**

या मानदंडानुसार अधिकोषांनी आपल्या (Non Performing Assets) करीता पूर्णपणे व्यवस्था केली पाहिजे. ह्या करिता दोन वर्षाची मुदत देऊन अनुमानित रक्कम १०,००० कोटी रु. ठरविण्यात आली.

**७) कर्ज वसुलीबाबत कायदा -**

अधिकोष व दुसऱ्या वित्तीय संस्थांच्या गेल्या काही वर्षातील कर्ज वसुली असंतोषजनक आहे. त्यासाठी १९९३ मध्ये कायदा तयार करण्यात आला. ज्या अंतर्गत कर्ज वसुलीच्या पद्धतीला सोयीस्कर बनविण्यासाठी विशेष वसुली अधिकरण स्थापन करण्याची व्यवस्था आहे.

### ८) कार्य करण्याचे स्वातंत्र्य -

व्यापारी अधिकोषांना नवीन शाखा उघडण्याचे व विस्तार काऊंटर कायम ठेवण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले. त्याच बरोबर ग्रामीण भाग वगळून इतर भागातील अक्षम शाखा बंद करण्याची परवानगी देण्यात आली.

### ९) नवीन खाजगी क्षेत्रातील अधिकोष -

रिझर्व्ह बँकेने खाजगी क्षेत्र अधिकोष स्थापनेकरिता काही निर्देशक तत्व घोषीत केले आहे. या व्यतिरिक्त अशा अधिकोषांना दुर्बल क्षेत्राकरिता अन्य अधिकोषांच्या तुलनेत निधीचे उद्दिष्ट पूर्ण करावे लागेल.

**१०)** १९९७-९८ च्या नरसिंहम समितीची नविनतम शिफारस म्हणजे आजारी बँका सक्षम बँकामध्ये विलीन करण्याऐवजी त्यांना बंद करण्यात यावे ही शिफारस केली.

वित्तीय प्रणालीवरील नरसिंहम समितीच्या शिफारशी विचारात घेऊन अधिकोषण क्षेत्रात वरील सुधारणा करण्यात आल्या.

### अलाभदायी मालमत्ता (Non Profitable / Non-performing Assets)-

अधिकोषांनी आपल्या ग्राहकांना दिलेल्या कर्जावरील व्याज जर सहा महिन्यांपर्यन्त थकीत झाले तर त्या मालमत्तेला अलाभदायी मालमत्ता समजण्यात येते. या अलाभदायी मालमतेचे प्रमाण कमीत कमी करण्यासाठी १९९१ पासून रिझर्व्ह बँक सतत प्रयत्नशील आहे. या संदर्भात या अलाभदायी मालमतेचे प्रमाण शेकडा १० च्या आतच ठेवावे असे रिझर्व्ह बँकेने सर्व बँकांना आदेश दिले होते. १९९८ मध्ये १० टक्केच्या आत ठेवावे असे आदेश दिले यात पुन्हा बदल करण्यात येऊन २००० पर्यन्त हे प्रमाण ५ टक्के पेक्षाही कमी करावे अशी सूचना बँकांना देण्यात आली.

## अपेक्षित प्रश्न

### दिर्घोत्तरी प्रश्न

१. व्यापारी अधिकोष प्रत्यय निर्मिती कशा प्रकारे करतात ते स्पष्ट करा. प्रत्यय निर्मितीच्या मर्यादा सांगा.

२) भारतातील अधिकोषण क्षेत्रातील सुधारणांवर चर्चा करा.

### लघुत्तरी प्रश्न

१. व्यापारी अधिकोषाच्या प्रत्यय निर्मितीवरील मर्यादा विशद करा.

२. रोख ठेवी व निर्मित ठेवी यांचा संबंध स्पष्ट करा.

३. प्रत्ययाचा निर्माता कोण? यावर चर्चा करा.